क्रमांक: बीपीए. १०९३/इएफएलसी-२,
गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक:- २५ फेब्रुवारी १९९४.

प्रति,

१] आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२] सर्व जिल्हाधिकारी,

३] सर्व अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क.

विषय:- देशी/विदेशी दारु किरकोळ विक्री दुकानाच्या स्थलांतराबाबत/अनुज्ञप्तीमध्ये भागीदार घेण्याबाबत/अनुज्ञप्ती हस्तांतर करण्याबाबत असे प्रस्ताव विचारात घेतांना वापरावयाची मार्गदर्शक तत्वे.

संदर्भ :- १] शासनाचे गोपनीय इंग्रजी पत्र क्र. बीपीए. १०८९/पीआरओ-२, दि. १८ फेब्रुवारी १९८९.
२] मुख्य सचिवांचे गोपनीय अ. शा. पत्र क्र. बीपीए. १०८९/पीआरओ-२, दि. १८ फेब्रुवारी १९८९.
३] शासकीय परिपत्रक, गृह विभाग, क्र. एफएलआर. ११८९/६[३]/पीआरओ-२, दि. २२ फेब्रुवारी ८९
४] शासकीय परिपत्रक, गृह विभाग, क्र. सीएलआर. १०८९/३८२/२३/पीआरओ-३, दि. २२ फेब्रुवारी ८९.
५] शासन अधिसूचना क्र. बीपीए. १०८९/एक[रोमन] ते ७[रोमन] पीआरओ-२, दि. १७ फेब्रुवारी ८९. अन्वये नियम व आदेश यामध्ये केलेल्या दुरुस्त्या.
६] बीपीए. १०८९/पीआरओ-२, दि. ६. ७. ८९

वरील १ ते ६ संदर्भाधीन पत्रान्वये देशी/विदेशी दारुची दुकाने व अनुज्ञप्त्यांबाबत तपशिलवार मार्गदर्शन तत्वे जारी करण्यात आलेली होती. परंतु शासन अधिसूचना क्र. बीपीए. ११८९/पीआरओ-२, दिनांक २. १२. ८९ अन्वये एफएल २ अनुज्ञप्तीच्या नमुन्यात अट क्र. ४-अ समाविष्ठ करण्यात आली होती. परंतु सदरची अट क्र. ४-अ शासन अधिसूचना क्र. एफएलआर. १३८३/३४/इएफएलसी-२, दिनांक ३०. ८. ९३ अन्वये वगळण्यात आलेली आहे. त्यामुळे क्र. बीपीए. १०८९/पीआरओ-२, दिनांक ६. ७. ८९ अन्वये जारी करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनामध्ये सोबत जोडल्याप्रमाणे बदल करण्यात येत आहे.

| अ.क्र. | परिशिष्ठ | सध्याची तरतूद | करावयाचा बदल |
| --- | --- | --- | --- |
| | | ७] नव्या ठिकाणी स्थलांतरीत करण्यात येणा-या दुकानची जागा अंतरनिर्बंध [७५ मीटर्स] मुक्त असावी. | बदल नाही. |
| | | ८] ज्या गावात दुकान स्थलांतरीत करावयाचे आहे त्या गावच्या ग्रामपंचायतीने ग्रामसभा घेऊन ना हरकत प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे. त्या गावच्या ग्रामसभेचे ना हरक प्रमाणपत्र नसल्यास तेथे दुकान स्थलांतर करण्यास परवानगी देऊ नये. | बदल नाही |
| | | ९] ज्या नवीन जागेत दुकान स्थलांतरीत करावयाचे आहे त्या जागेचे बांधकाम अधिकृत असल्याबद्दलचा दाखला, सक्षम [कर्तेवंधी] अधिका-याने दिलेला असला पाहिजे. | बदल नाही. |
| २] | | | |

## देशी/विदेशी दारू किरकोळ विक्री अनुज्ञप्तीमध्ये भागीदार घेणेबाबत.

| अ.क्र. | परिशिष्ठ | सध्याची तरतूद | करावयाचा बदल |
|---|---|---|---|
| | "क" | १] मूळ अनुज्ञप्तीधारकास नफ्याचा वाटा जास्त मिळावा.<br>२] मूळ अनुज्ञप्तीधारकाचा मृत्यू-अपंगत्व अथवा अन्य कोणत्याही कारणाने अनुज्ञप्तीशी संबंध तुटला तरी नवीन घेतल्या जाणाऱ्या भागीदाराच्या अनुज्ञप्तीवर कोणताही हक्क राहणार नाही. | १] बदल नाही.<br>२] मूळ अनुज्ञप्तीधारकाचा मृत्यू, अपंगत्व, आर्थिकदृष्ट्या व्यवसाय चालवणे होत नाही अथवा अन्य कोणत्याही कारणाने अनुज्ञप्तीशी संबंध तुटला तर नवीन घेतल्या जाणाऱ्या भागीदाराच्या नावे अनुज्ञप्ती करण्यात यावी. परंतु मूळ अनुज्ञप्तीधारकाचे सर्व वारसदारांची त्याला संमती असली पाहिजे. जरी मूळ अनुज्ञप्तीधारक जीवंत असला तरी त्याच्या वारसदाराची संमती घेणे आवश्यक आहे. तसेच भागीदार घेणे आणि मूळ भागीदाराचे अनुज्ञप्तीमध्ये स्वारस्य नसल्यास भागीदाराच्या नावे अनुज्ञप्ती हस्तांतर करतांना प्रत्येक प्रकरणी शासनाची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे. भागीदाराच्या नावे अनुज्ञप्ती पदवितांना व वगळतांना नियमाप्रमाणे आवश्यक ते शुल्क वसूल करण्यात यावे. |

| परिशिष्ठ | सध्याची तरतूद | करावयाचा बदल |
| --- | --- | --- |
| "क" | देशी/विदेशी दारूची किरकोळ विक्रीच्या दुकानामध्ये अनुज्ञप्तीत असलेल्या भागीदारांची नावे वगळण्याबाबत विचारात घ्यावयाची मार्गदर्शक तत्वे. | |
| | १] मूळ अनुज्ञप्ती भागीदारी संस्थेच्या [फर्म] नावे मंजूर केलेली असल्यास त्यातील एका भागीदाराचे नाव कमी करण्यास परवानगी देऊ नये.अशा भागीदारापैकी एखादा भागीदार मृत झाल्यास त्याचेऐवजी त्यांच्या वारसांची नावे दाखल करण्यात येतील. | १] मूळ अनुज्ञप्ती भागीदारी संस्थेच्या [फर्म] नावे मंजूर केलेली असल्यास त्यातील भागीदाराने/भागीदारांनी नाव कमी करण्याची विनंती केल्यास अशा भागीदारांची नावे कमी करण्यात यावीत. परंतु त्याकरिता शासनाची पूर्वपरवानगी घेण्यात यावी. |
| | २] मूळ अनुज्ञप्तीधारकाने अनुज्ञप्तीवरील व्यवसाय चालू केल्यानंतर जिल्हाधिका-यांच्या वा शासनाच्या परवानगीने दुसरा भागीदार व्यवसायामध्ये घेतला असल्यास मूळ भागीदाराचे नाव वगळण्यासंबंधीचा प्रस्ताव मान्य करु नये. नवीन आलेल्या भागीदाराचे नाव अर्थातच मूळ अनुज्ञप्तीधारकाने तशी विनंती केल्यास वगळण्यात परवानगी देता येईल. | २] मूळ अनुज्ञप्तीधारकाचे मृत्यू,अपंगत्व,आर्थिकदृष्टया व्यवसाय चालविणे शक्य होत नाही अथवा अन्य कोणत्याही कारणाने अनुज्ञप्तीशी संबंध तुटला तर नवीन घेतल्या जाणा-या भागीदाराच्या नावे अनुज्ञप्ती करण्यात यावी. परंतु मूळ अनुज्ञप्तीधारकाचे सर्व वारसदाराची त्याला संमती असली पाहिजे. जरी मूळ अनुज्ञप्तीधारक जिवंत असला तरी त्यांच्या वारसदाराची संमती घेणे आवश्यक आहे. तसेच भागीदार घेणे आणि मूळ भागीदाराचे अनुज्ञप्तीत स्वारस्य नसल्यास भागीदाराच्या नावे अनुज्ञप्ती हस्तांतर करतांना शासनाची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. भागीदाराच्या नावें अनुज्ञप्ती चढवितांना व वगळतांना नियमाप्रमाणे आवश्यक ते शुल्क वसूल करण्यात यावे. परंतु नवीन असलेल्या भागीदाराने नाव वगळण्याची विनंती केल्यास नवीन आलेल्या भागीदाराचे नाव वगळण्यात यावे. |

| परिशिष्ठ | सध्याची तरतूद | करावयाचा बदल |
|---|---|---|
| | ३] नव्याने येणाऱ्या भागीदारांच्या अथवा त्यांच्या कुटुंबियांच्या नावे कोणतीही अन्य अनुचित अबकारी अनुज्ञप्ती असता कामा नये. | ३] बदल नाही. |
| | ४] नवीन घ्यावयाच्या भागीदारांबाबत पोलीस अहवाल अनुकूल असावा व आवश्यकतेनुसार त्याने बँकेचे ऐपतपत्र द्यावे. | ४] बदल नाही. |
| | ५] नवीन भागीदार विक्रीकर/आयकरचे थकबाकीदार नसल्याबाबतचे प्रमाणपत्र हवे. | ५] बदल नाही. |
| | ६] भागीदाराच्या करारपत्रात वरील शर्त क्र. [१] व [२]चा अंतर्भाव असावा. | ६] भागीदारांच्या करारपत्रात फक्त वरील शर्त क्र. १ चा अंतर्भाव असावा. |
| | ७] सामान्यत: अनुज्ञप्तीमध्ये भागीदार घेण्यास योग्य व सबळ कारण असावे. भागीदारीच्या नावाखाली अनुज्ञप्तीवरील व्यवसाय नवीन भागीदाराच्या हवाली करुन अनुज्ञप्ती विकण्याचा उद्देश नसावा. नवीन भागीदार घेण्यास अनुज्ञप्तीधारकाने विनंती केल्यास परवानगी दिलीच पाहिजे असे जिल्हाधिकाऱ्यांवर बंधन नाही. | ७] बदल नाही. |

परिशिष्ठ "ड"

**देशी व विदेशी दारुच्या अनुज्ञप्ती एकाच्या नावावरून दुसऱ्यांच्या नावे करण्याबाबत**

| संध्याची तरतूद | करावयाचा बदल |
| --- | --- |
| १] अनुज्ञप्तीचे हस्तांतर फक्त अनुज्ञप्तीधारकाच्या मृत्यूनंतर त्याच्या वारसाच्या वा वारसांच्या नावे करता येईल, अन्यथा नाही. एकापेक्षा अधिक वारस असल्यास, त्यापैकी कुणाच्याही एकाच्या वा अनेकांच्या नावे उर्वरित वारसांची ना हरकत प्रमाणपत्रे घेऊन वर्ग करता येईल. एकापेक्षा अधिक वारसांच्या नावे अनुज्ञप्ती करावयाची असल्यास शक्यतो त्यांचे रितसर भागीदारी पत्र करुन घ्यावे. वारसांमध्ये वाद असेल किंवा वारस कोण याबद्दल वाद असेल तर असे वाद संबंधितांनी दिवाणी कोर्टात जाऊन मिटवावेत. दरम्यानच्या काळात असे वाद मिटत नाहीत तोपर्यंत अनुज्ञप्ती कुणाच्याच नावे न करता निलंबित ठेवावी. अनुज्ञप्ती भागीदारीत असेल व एका भागीदाराचा मृत्यू झाल्यास मृत भागीदाराच्या वारसांची नावे लावतानाही हाच नियम पाळावा. नवीन घेतलेला भागीदार मृत झाल्यास त्याच्या वारसांची नावे मूळ अनुज्ञप्तीधारकाच्या परवानगीनेच लागू शकतात. | १] अनुज्ञप्तीचे हस्तांतर अनुज्ञप्तीधारकाच्या मृत्यूनंतर त्याच्या वारसाच्या वा वारसांच्या नावे करता येईल. एकापेक्षा अधिक वारस असल्यास, त्यापैकी कुणाच्याही एकाच्या वा अनेकांच्या नावे उर्वरित वारसांची ना हरकत प्रमाणपत्रे घेऊन वर्ग करता येईल. एकापेक्षा अधिक वारसांच्या नावे अनुज्ञप्ती करावयाची असल्यास शक्यतो त्यांचे रितसर भागीदारी पत्र करुन घ्यावे. वारसांमध्ये वाद असेल किंवा वारस कोण याबद्दल वाद असेल तर असे वाद संबंधितांनी दिवाणी कोर्टात जाऊन मिटवावेत. दरम्यानच्या काळात असे वाद मिटत नाहीत तोपर्यंत अनुज्ञप्ती कुणाच्याच नावे न करता निलंबित ठेवावी. अनुज्ञप्ती भागीदारीत असेल व एका भागीदाराचा मृत्यू झाल्यास मृत भागीदाराच्या वारसांची नावे लावतानाही हाच नियम पाळावा. नवीन घेतलेला भागीदार मृत झाल्यास त्याच्या वारसांची नावे मूळ अनुज्ञप्तीधारकाच्या परवानगीनेच लागू शकतात. मूळ अनुज्ञप्तीधारकाचे मृत्यूनंतर अथवा अपंगत्व अथवा आर्थिकदृष्टया व्यवसाय परवडत नसल्याने अथवा इतर कारणामुळे अनुज्ञप्तीचे हस्तांतर नवीन आलेल्या भागीदाराच्या नावे करता येईल. परंतु त्यासाठी मूळ अनुज्ञप्तीधारक मृत झाल्यास/किंवा हयात असला तरीसुध्दा त्याच्या सर्व वारसदारांची या हस्तांतरास सहमती असली पाहिजे. |

| अ.क्र. | परिशिष्ठ | सध्याची तरतूद | करावयाचा बदल |
| --- | --- | --- | --- |
| | | २] वारसाच्या अथवा त्यांच्या कुटुंबियांच्या नावे कोणतीही अनुसूचित अबकारी अनुज्ञप्ती असता कामा नये. | २] बदल नाही. |
| | | ३] वारसांबाबत पोलीस अहवाल अनुकूल असावा. | ३] बदल नाही. |

शासन पत्र, गृह विभाग क्रमांक-बीपीए-१०८९/पीआरओ-२, दिनांक ६.७.८९ मधील मार्गदर्शक तत्वामध्ये करावयाचा बदल

| अ.क्र. | परिशिष्ट | सध्याची तरतूद | करावयाचा बदल |
|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. |
| १] | "ब" | **देशी/विदेशी दारु दुकानांच्या किरकोळ विक्री स्थलांतराबाबतचे प्रस्ताव** | |
| | | १] एका तालुक्यातून दुसऱ्या तालुक्यात स्थलांतरास परवानगी नाही.<br>२] खेडेगावातील देशी/विदेशी दारुचे दुकान नगरपालिका/महानगरपालिका असलेल्या ठिकाणी स्थलांतरीत करण्यात परवानगी देऊ नये.<br>३] एका नगरपालिकेच्या हद्दितून दुसऱ्या नगरपालिकेच्या हद्दितजरी अशी ठिकाणे एकाच तालुक्यात असली तरी तेथे दुकान बदलून देण्यात येऊ नये.<br>४] जर महापालिकेच्या किंवा नगरपालिकेच्या विस्तारीत हद्दित समाविष्ठ करण्यात आलेल्या सीमा क्षेत्रातील हे क्षेत्र पूर्वी ग्रामीण भाग असताना दिलेले दुकान असेल तर ते शहराच्या मूळ हद्दित असलेल्या कोणत्याही ठिकाणी बदलून देण्यास अनुमती देऊ नये. | १ ते ४ बद्दल बाबत बदल खालीलप्रमाणे –<br>जिल्ह्यातील देशी/विदेशी दारुच्या किरकोळ विक्रीच्या दुकानाचे स्थलांतर जिल्ह्यातील कोणत्याही तालुक्यात नगरपालिका/महानगरपालिका क्षेत्रात किंवा ग्रामीण भागात करता येईल. परंतु स्थलांतरीत करावयाच्या दुकानाची संख्या जिल्ह्यातील सध्या अस्तित्वात असलेल्या दुकानाच्या १०% पेक्षा जास्त नसावी. स्थलांतर करावयाच्या दुकानाची आता असलेल्या ठिकाणी विक्री खरोखरच कमी स्वरुपात आहे काय याची छाननी करण्यात यावी. याकरिता मागील ३ वर्षांचा व्यवहार लक्षात घेण्यात यावा. तसेच दुकानाचे स्थलांतर झाल्यास त्या भागातील लोकांना मद्य मिळण्याची गैरसोय होणार नाही याबाबतचा मुद्दा विचारात घ्यावा. स्थलांतरास परवानगी देण्यापूर्वी शासनाची मान्यता घेण्यात यावी. |
| | | ५] जेथून दुकान स्थलांतरीत करण्यात येते त्या ठिकाणी देशी/विदेशी दारु पिण्याची गैरसोय न व्हावी. | बदल नाही. |
| | | ६] नव्या ठिकाणी स्थलांतरीत करण्यात येणाऱ्या दुकानाची जागा सर्व दृष्टीने योग्य असावी. | बदल नाही. |